# नागरवस्ती विकास योजना , पुणे महानगरपालिका

## जाहिर प्रकटन

## सन २०११–२०१२

पुणे महानगरपालिकेच्या हद्दीत राहणाऱ्या आणि इ. १० वी तसेच इ. १२ वी मध्ये ८० % पेक्षा जास्त गुणांनी उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना पुढील शिक्षणासाठी अर्थसहाय्य देण्यासाठी पुणे महानगरपालिकेच्या अंदाजपत्रकामध्ये मागासवर्गीय कल्याणकारी योजना निधी व युवक कल्याणकारी निधी या योजनांतर्गत इ. १० वी च्या विद्यार्थ्यांसाठी भारतरत्न मौलाना अबुल कलाम आझाद योजनेअंतर्गत रू. १५,०००/– आणि इ. १२ वी च्या विद्यार्थ्यांसाठी लोकशाहीर अण्णाभाउ साठे योजनेअंतर्गत रू. २५,०००/– अर्थसहाय्य देण्याची योजना कार्यान्वित आहे. इ.१० वी इ.१२ वी उत्तीर्ण विद्यार्थ्यांसाठी सुधारित शैक्षणिक अर्थसहाय्य योजनेअंतर्गत खालील नियम व अटींत बसणाऱ्या मुलांच्या पालकांकडून छापील नमुन्यात अर्ज मागविण्यात येत आहेत. अर्जांच्या छायाप्रतीही ग्राहय धरण्यात येतील.

| अ.क्र. | योजनेचे नाव | तपशील |
|---|---|---|
| १ | भारतरत्न मौलाना अबुल कलाम आझाद शैक्षणिक योजना(सुधारित) | १) सन २०१०–११ (मार्च–एप्रिल) या शैक्षणिक वर्षात इ.१० वी मध्ये कमीत कमी ८०% गुण मिळणे आवश्यक आहे. तथापि पुणे महानगरपालिकेच्या शाळेत असल्यास/रात्रशाळेत असल्यास/४०% अपंगत्व असल्यास कमीत–कमी ७०% गुण मिळणे आवश्यक आहे.<br>२) शैक्षणिक अर्थसहाय्य हे इ.१० वी नंतर शासनमान्य/विद्यापीठमान्य संस्थेत प्रवेश घेतला असल्यासच मिळेल. |
| २ | लोकशाहिर अण्णाभाऊ साठे शैक्षणिक योजना(सुधारित) | १) सन २०१०–११ (मार्च–एप्रिल) या शैक्षणिक वर्षात इ.१२ वी मध्ये कमीत कमी ८०% गुण मिळणे आवश्यक आहे. तथापि पुणे महानगरपालिकेच्या शाळेत असल्यास/रात्रशाळेत असल्यास/४०% अपंगत्व असल्यास कमीत कमी ७०% गुण मिळणे आवश्यक आहे.<br>२) शैक्षणिक अर्थसहाय्य हे इ.१२ वी नंतर शासनमान्य/विद्यापीठमान्य संस्थेत प्रवेश घेतला असल्यासच मिळेल. |

**अटी व नियम** :– इ. १० वी उतीर्णांसाठी रक्कम रु.१५,०००/– व इ. १२ वी उतीर्णांसाठी रु.२५,०००/– ही कमाल मर्यादा शैक्षणिक अर्थसहाय्यासाठी राहील. मात्र आलेल्या अर्जांची संख्या विचारात घेऊन पुणे महानगरपालिकेने यासाठी उपलब्ध केलेली आर्थिक तरतूद पात्र लाभार्थ्यांना समप्रमाणात विभागून देण्यात येईल.

१) अन्य कोणत्याही शासकीय/निमशासकीय किंवा पुणे महानगरपालिकेच्या योजनेतून शैक्षणिक अर्थसहाय्य मिळत असल्यास किंवा अर्ज केला असल्यास, ते या योजनेचा लाभ घेण्यास अपात्र ठरतील.

२) विद्यार्थी मागासवर्गीय असल्यास जातीचा दाखला जोडावा.

३) विद्यार्थी हा पुणे मनपा हद्दीतील शाळेतूनच पास झालेला असावा व पुढील शिक्षणासाठी प्रवेशदेखील पुणे मनपा हद्दीतील कनिष्ठ महाविद्यालयात घेतलेला असावा. मात्र केंद्रीय प्रवेश पध्दतीने पुणे मनपा हद्दीबाहेर प्रवेश मिळाला, तर त्याचा विचार करण्यात येईल. पुणे मनपा हद्दीत राहणाऱ्या परंतु हद्दीबाहेर लगतच्या असणाऱ्या शाळेत/कॉलेजमध्ये प्रवेश घेतलेल्यांचा विचार करण्यात येईल.

४) अर्जदाराने खोटी माहिती दिल्यास, अर्ज रद्द करण्यात येईल. तसेच अनुदान जर अदा झाले असेल, तर त्याची वसुली करण्यात येईल.

५) खर्चाच्या पावत्या जोडण्याची आवश्यकता नाही.

६) अर्ज पूर्ण भरुन देण्याची जबाबदारी अर्जदारांवर राहील. अपूर्ण कागदपत्रांमुळे अर्ज नामंजूर झाल्यास त्याची जबाबदारी पुणे मनपाची असणार नाही.

याशिवाय छापील अर्जामधील सर्व अटी व नियम लाभार्थ्यांवर बंधनकारक राहतील. आलेल्या अर्जांचा तसेच उपलब्ध आर्थिक तरतुदीचा व नियम/अटींचा विचार करुन अर्ज नाकारण्याचा वा स्विकारण्याचा अधिकार उप आयुक्त तथा प्रकल्प संचालक, नागरवस्ती विकास योजना यांना राहील.

उपरोक्त योजनेचे छापील अर्ज सर्व क्षेत्रिय कार्यालयांत दि.१ जुलै, २०११ पासून विनाशुल्क उपलब्ध करुन देण्यात आले असून, जाहिरात प्रसिध्द झाल्यापासून दि.१६ ऑगस्ट , २०११ पर्यंत पूर्तता केलेले अर्ज फक्त नागरवस्ती विकास योजना, मुख्य कार्यालय, मनपा भवन, या ठिकाणी कार्यालयीन कामकाजाचे दिवशी सकाळी १०.३० ते सायं.५.०० वाजेपर्यंत स्विकारण्यात येतील. मुदतीत न आलेले अर्ज स्विकारले जाणार नाहीत. मुदतवाढ देण्यात येणार नाही. अर्ज दिल्यावर पोहोच पावती घेण्यात यावी. अन्यथा जमा केलेल्या अर्जांची जबाबदारी पुणे मनपाची राहणार नाही. पात्र लाभार्थी यांना अर्थसहाय्य मंजूर धनादेश वाटपाच्या कार्यक्रमाबाबतचे जाहीर निवेदन वर्तमानपत्रात प्रसिध्द करण्यात येईल, त्यानंतरच अर्जदारांनी संबंधित क्षेत्रित कार्यालयामध्ये संपर्क साधावा.

**महेश पाठक**
महापालिका आयुक्त
पुणे महानगरपालिका

**मोहनसिंग राजपाल**
महापौर
पुणे महानगरपालिका